दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५१ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

**सोयगाव पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक संपन्न**

(पान २ वर)



» Selected

### पंतप्रधान मोदींकडून वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरचे लोकार्पण

मुंबई : नरेंद्र मोदी यांनी आज (8 सप्टेंबर) गुजरातमधील वडोदरा येथे 35 हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन केलं. यावेळी त्यांनी वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरराष्ट्राला समर्पित केले. या तीन टप्प्यांच्या कार्यान्वित होण्यामुळे डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या पश्चिम विभागाचं संपूर्ण नेटवर्क आता पूर्ण लांबीवर कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे मालवाहतुकीची क्षमता आणि कार्यक्षमता वाढण्यास मदत आहे.पश्चिम विभागीय मालवाहू कॉरिडॉरचा तीन महत्त्वाच्या टप्प्यांचे राष्ट्रार्पण झाल्यामुळे हा संपूर्ण भव्य प्रकल्प आता पूर्णत्वाला जाणार आहे. वडोदरा येथून मोदी तर महाराष्ट्रातील JNPA येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संयुक्तपणे हिरवा झेंडा दाखवून या सेवांचा शुभारंभ केला.

## मुंबई महापालिकेत आतापर्यंत 5 नगरसेवकांची निवड रद्द झाली

# 79 नगरसेवकांचे नगरसेवकपद धोक्यात?

## सर्वात जास्त नगरसेवक अडचणीत असलेल्या पक्षाचे नाव जाणून शॉक व्हाल!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। मुंबई महानगरपालिकेमध्ये सर्वच पक्षांना मोठा धक्का बसू शकतो अशी थक्क करणारी आकडेवारी समोर आली. याच वर्षाच्या सुरुवातीला मुंबई महापालिका निवडणुकीत विजयी झाल्यानंतरही सुमारे 79 नगरसेवकांच्या डोक्यावर निवडणूक याचिकेची टांगती तलवार आहे. त्यामुळे निवडणुकीतला विजय अंतिम असला तरी कायदेशीर लढाई संपलेली नाही.**

नेमक्या कोणत्या पक्षाच्या किती नगरसेवकांविरोधात याचिका आहेत?मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतरही विजयी उमेदवारांची डोकेदुखी कायम असल्याचे समोर आल आहे. निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी विजयी नगरसेवकांच्या निवडीला विविध कारणांवरून आव्हान दिलं. एकूण 79 याचिका दाखल झाल्याची माहिती मुंबई महापालिकेने आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांना दिली. यात सर्वाधिक याचिका आहेत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या नगरसेवकांविरोधात. संख्या आहे 24, भाजपच्या 16 नगरसेवकांविरोधात याचिका आहेत. कॉंग्रेसच्या 10, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या



7, एमआयएमच्या 5 मनसेच्या 2 तर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या एका नगरसेवकाविरोधात याचिका आहे. आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांच्या अर्जातून ही माहिती समोर आली आहे. महापालिकेने दिलेल्या उत्तरात ही आकडेवारी नमूद करण्यात आली. निवडणूक प्रतिज्ञापत्रात उमेदवाराला मालमत्ता, दायित्वे, गुन्हेगारी प्रकरणं आणि महत्त्वाची माहिती जाहीर करावी लागते. याचा आधार घेत प्रतिस्पर्धी उमेदवारांनी जात प्रमाणपत्राच्या वैधतेपासून प्रतिज्ञापत्रातील माहितीपर्यंत विविध मुद्दे उपस्थित करत याचिका दाखल केल्या आहेत. उमेदवारांनी खोटी अथवा चुकीची माहिती दिल्याचा आरोप, गुन्हेगारी प्रकरणांची माहिती लपविणे, संपत्ती व आर्थिक बाबींबाबत चुकीच्या घोषणा करणे आदी कारणांवरूनही निवडीला आव्हान देण्यात आले आहे. विशेष म्हणजे या याचिकांमध्ये विशिष्ट पक्षांचे नगरसेवक लक्ष्य नसून सर्वपक्षीय नगरसेवकांविरोधात निवडणूक याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मुंबई महापालिकेत आतापर्यंत 5 नगरसेवकांची निवड रद्द झाली आहे. यात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या विशाखा राऊत आणि दीपक सावंत यांचा समावेश आहे. एमआयएमचे शमीर पटेल आणि रोशन शेख आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बुशरा मलिक यांचीही निवड रद्द झाली आहे. विशाखा राऊत यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरलं. त्यामुळे त्यांचं नगरसेवकपद गेलं. राऊत यांच्या कारवाईनंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचं संख्याबळ 65 वरून 63 वर आलं. आता उरलेल्या याचिकांवर न्यायालय काय निर्णय देतं. याकडे सगळ्यांचं लक्ष आहे.नेमक्या कोणत्या पक्षाच्या किती नगरसेवकांविरोधात याचिका आहेत?मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतरही विजयी उमेदवारांची डोकेदुखी कायम असल्याचे समोर आल आहे

### किती जणांच्या राजकीय प्रवासाला ब्रेक

आणखी काही नगरसेवकांची निवड रद्द झाली. तर महापालिकेतील पक्षीय गणितही बदलू शकतं. म्हणजेच मुंबईकरांनी दिलेला कौल महत्त्वाचा आहेच. पण त्या कौलाला कायदेशीर वैधतेची मोहर मिळणंही तितकंच महत्त्वाचं. पालिकेच्या सत्तेची गणितं ठरलीत. पण काही नगरसेवकांच्या खुर्च्यांवर अजूनही न्यायालयाची नजर आहे. आता पाहायचं या 79 याचिकांपैकी किती नगरसेवकांचा विजय टिकतो. किती जणांच्या राजकीय प्रवासाला कायदेशीर ब्रेक लागतो.

## एकनाथ शिंदेंना नेमका कोणत्या कामसाठी ब्रिटनमध्ये दिला जाणार 'कॉमनवेल्थ लीडरशिप' पुरस्कार?

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उल्लेखनीय कार्याची आणि लोककल्याणकारी योजनांची दखल आता आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. ब्रिटनच्या संसदेत आज आणि उद्या म्हणजेच 9 आणि 10 सप्टेंबर रोजी आ दोन महत्वपूर्ण आणि स्वतंत्र कार्यक्रम होणार असून त्यासाठी विशेष पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत. या दोन दिवसीय लंडन दौऱ्यामध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांना तीन विविध पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. त्यामध्ये ब्रिटिश संसदेच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस् मध्ये शिंदे यांचा 'कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन' या पुरस्कारासोबतच 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये आयोजित 'इंटरनॅशनल कॉन्क्लेव्ह 2026' मध्ये त्यांना 'स्टेटस्मनशिप अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात येणार असून महाराष्ट्र मंडळातर्फे 'ग्लोबल प्राईड ऑफ महाराष्ट्र' या पुरस्काराने त्यांना गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, या दोन दिवसीय दौऱ्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे मंगळवारी रात्री लंडनला रवाना झाले.यूके एशियन बिझनेस कौन्सिल आणि 'कॅनव्हास फॉर केअर क्रिएटिव्ह आर्ट कॅम्पस' यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, 9 सप्टेंबर रोजी हाऊस ऑफ लॉर्ड्स येथे 'कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन' सोहळा पार पडणार आहे. उत्तर आयर्लंडच्या माजी फर्स्ट मिनिस्टर द राइट ऑनरेबल बॅरोनेस आर्लेन फॉस्टर आणि यूके एशियन बिझनेस कौन्सिलचे चेअरमन अँड्र्यू ग्रोकॉक यांच्या वतीने कौन्सिलचे उपाध्यक्ष सुदीप सकाळे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना निमंत्रण पाठवले आहे. शिंदे मुख्यमंत्रीपदी असताना आणि आता



उपमुख्यमंत्री म्हणून राबवलेल्या नागरिक-केंद्री, पारदर्शक आणि नाविन्यपूर्ण प्रशासन पद्धतीसाठी हा बहुमान दिला जाणार असल्याचे निमंत्रकांनी म्हटले आहे. या सन्मानासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कार्यकाळातील तीन प्रमुख कल्याणकारी योजनांची विशेष दखल घेतली असून यामध्ये महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठीची 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', नागरिकांना शासकीय सेवा थेट घरापर्यंत पोहोचवणारा 'शासन आपल्या दारी' उपक्रम आणि तरुणांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव व रोजगार मिळवून देणारी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' यांचा प्रामुख्याने समावेश आहे. हा सन्मान पूर्णपणे प्रशासकीय कार्यक्षमता, महिला सक्षमीकरण आणि थेट लाभ हस्तांतरण यांवर आधारित असल्याचे 'युकेएबीसी'ने स्पष्ट केले आहे. याशिवाय, या सोहळ्यादरम्यान 'कॅनव्हास फॉर केअर' या संसदीय कला प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले असून, यात ब्रिटनमधील मुलांनी महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण योजना' आणि 'शासन आपल्या दारी' या योजनांच्या संकल्पनेवर रेखाटलेली चित्रे प्रदर्शित केली जाणार आहेत. दरम्यान, 10 सप्टेंबर रोजी इंडो-युरोपियन बिझनेस फोरम आणि वर्ल्ड लीडरशिप फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रिटिश संसदेच्या 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये 'इंटरनॅशनल कॉन्क्लेव्ह 2026: ग्लोबल बिझनेस अँड इन्व्हेस्टमेंट डायलॉग' चे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांना मुख्य अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. याच सोहळ्यात उपमुख्यमंत्र्यांना 'स्टेटसमनशिप अवॉर्ड'ने गौरविण्यात येणार आहे. आर्थिक व गुंतवणूक केंद्र असल्याने, परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या विकासाचे व्हिजन आणि भारत-यूके आर्थिक संबंधांविषयीचे मार्गदर्शन करणार आहेत.

## दुर्गापूजेदरम्यान मासे, मटण खाणारे लोक 'पाखंडी'; धीरेंद्र शास्त्री यांचे विधान

जन सम्राट टाईम्स

**कोलकाता | प्रतिनिधी:** दुर्गापूजा उत्सवाच्या तोंडावर बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र शास्त्री यांनी मांसाहाराबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून पश्चिम बंगालमध्ये नवा वाद पेटला आहे.दुर्गापूजेदरम्यान मासे किंवा मटण खाणारे लोक 'पाखंडी' असतात, असे वक्तव्य धीरेंद्र शास्त्री यांनी हावडा येथील कार्यक्रमात केले होते.या वक्तव्यावरून कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेत शास्त्री यांच्या विरोधात पोलिसात अधिकृत तक्रार दाखल केली असून त्यांच्या अटकेची मागणी केली आहे. कॉंग्रेसच्या दक्षिण कोलकाता आणि मध्य कोलकाता जिल्हा अध्यक्षांनी अनुक्रमे भवानीपूर पोलिस ठाण्यात आणि कोलकाता पोलिस आयुक्तांकडे ई-मेलद्वारे ही तक्रार नोंदवली आहे.बंगालमधील दुर्गापूजा हा केवळ धार्मिक सण नसून एक सांस्कृतिक उत्सव आहे. दुर्गापूजेदरम्यान मासे किंवा मांसाहार करण्याची बंगालमध्ये शतकानुशतके जुनी परंपरा आहे. कोणतीही परप्रांतीय व्यक्ती येऊन बंगाली संस्कृती आणि आहाराच्या सवयींवर हुकूमशाही गाजवू शकत नाही, असा आरोप कॉंग्रेसने केला आहे. धीरेंद्र शास्त्री यांनी 'घाणेरडे अन्न' आणि 'पाखंडी' यांसारख्या शब्दांचा वापर करून बंगाली अस्मितेचा आणि दुर्गापूजेच्या भावनांचा अनादर केला आहे. त्यामुळे सामाजिक सलोखा धोक्यात येऊ शकतो, असे तक्रारीत नमूद केले आहे.

धीरेंद्र शास्त्रींच्या या विधानापासून पश्चिम बंगाल भाजपने अंतर राखले आहे. भाजप नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांनी स्पष्ट केले की, बंगालमध्ये काली पूजा आणि दुर्गापूजेदरम्यान बळी देण्याची आणि देवाला मासे-मटण नैवेद्य (प्रसाद) म्हणून दाखवण्याची जुनी परंपरा आहे. त्यामुळे येथील परिस्थिती देशाच्या इतर भागांपेक्षा वेगळी आहे.

## मराठा आरक्षणासाठी एकाने संपविले जीवन

जन सम्राट टाईम्स

**शिरूर अनंतपाळ । प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सुमठाणा येथील सुनील विनायक बिरादार (वय ४७) यांनी टोकाचे पाऊल उचलत विहिरीत उडी घेऊन जीवन संपविले.या घटनेनंतर संतप्त कुटुंबीय व ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत लातूर-उदगीर महामार्गावरील येरोळ मोड येथे मृतदेह आणून चक्काजाम आंदोलन सुरू केले. मंगळवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून सुरू असलेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. सुनील बिरादार यांनी हे टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी एक सुसाइड नोट लिहून ठेवली होती. त्यामध्ये, "मी सुनील विनायक बिरादार, रा. सुमठाणा, मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून विहिरीत उडी मारून जीवनयात्रा संपवत आहे. एक मराठा, लाख मराठा. जय शिवराय!" असा मजकूर असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.या घटनेनंतर कुटुंबीयांनी प्रशासनासमोर विविध मागण्या ठेवल्या आहेत.

कुटुंबातील एका सदस्याला तातडीने शासकीय सेवेत सामावून घेण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने द्यावे, तसेच मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र देण्याबाबत तातडीने




निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्यांचा त्यात समावेश आहे.मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी ठाम भूमिका कुटुंबीय व ग्रामस्थांनी घेतली आहे. येरोळ मोड येथे मोठ्या संख्येने नागरिक जमा झाले असून रात्री दहा वाजताही महामार्गावर चक्काजाम सुरूच होता.

दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिस व प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सुमठाणा येथील सुनील विनायक बिरादार (वय ४७) यांनी टोकाचे पाऊल उचलत विहिरीत उडी घेऊन जीवन संपविले.या घटनेनंतर संतप्त कुटुंबीय व ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत लातूर-उदगीर महामार्गावरील येरोळ मोड येथे मृतदेह आणून चक्काजाम आंदोलन सुरू केले. मंगळवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून सुरू असलेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## 12 वर्षांनंतर मुंबईतील नगरसेवकांच्या निधीत मोठी वाढ!

## आता 60 लाखांऐवजी मिळणार वार्षिक 'इतक्या' कोटींचा निधी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** मुंबईतील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि स्थानिक नागरी कामांना गती देण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने (BMC) एक अतिशय महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतल्या नगरसेवकांना मिळणाऱ्या वार्षिक निधीमध्ये तब्बल 12 वर्षांनंतर वाढ करण्यात आली आहे. आता मुंबईतील नगरसेवकांना 60 लाख रुपयांऐवजी वार्षिक तब्बल 1 कोटी रुपयांचा स्वेच्छा निधी मिळणार आहे. महापालिका सभागृहाने या संदर्भातील प्रस्तावाला अधिकृत मंजुरी दिली आहे.मुंबईतील नगरसेवकांच्या निधीत वाढ करण्यासंदर्भातील ठरावाची सूचना नगरसेविका अश्विनी मते यांनी महापालिका सभागृहात मांडली होती. या सूचनेवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर महापालिका सभागृहाने 1 कोटी रुपयांचा निधी देण्यास एकमुखाने मंजुरी दिली. आता या ठरावावर अंतिम निर्णयासाठी महापालिका आयुक्तांच्या अभिप्रायाची प्रतीक्षा आहे. महापालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, महापालिका आयुक्त अश्विनी भिडे (ASHWINI BHIDE) यांना सकारात्मक अभिप्राय देणे शक्य न झाल्यास, हा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी राज्य सरकारच्या नगरविकास खात्याकडे सादर केला जाईल.मात्र, गेल्या 12 वर्षांत झालेली प्रचंड महागाई, बांधकाम साहित्यांच्या मतीत झालेली वाढ आणि मजुरीच्या खर्चात झालेली वाढ यामुळे सध्या मिळणारा 60 लाख रुपयांचा निधी अत्यंत अपुरा पडत होता. त्यामुळे प्रभागातील



कामांना खीळ बसत असल्याने हा निधी 1 कोटी रुपये करण्याची आग्रही मागणी नगरसेविका अश्विनी मते यांनी केली होती. महापालिका सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. आयुक्त अश्विनी भिडे यांनी यावर सकारात्मक स्वाक्षरी केल्यास मुंबईतील सर्व नगरसेवकांना 1 कोटींचा सुधारित निधी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जर प्रशासकीय स्तरावर काही अडचणी आल्यास राज्य सरकारचे नगरविकास खाते यावर अंतिम मोहर उमटवेल. या निर्णयामुळे मुंबईतील विविध प्रभागांमधील विकासकामांना मोठा वेग मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुंबईतील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि स्थानिक नागरी कामांना गती देण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने (BMC) एक अतिशय महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतल्या नगरसेवकांना मिळणाऱ्या वार्षिक निधीमध्ये तब्बल 12 वर्षांनंतर वाढ करण्यात आली आहे. आता मुंबईतील नगरसेवकांना 60 लाख रुपयांऐवजी वार्षिक तब्बल 1 कोटी रुपयांचा स्वेच्छा निधी मिळणार आहे. महापालिका सभागृहाने या संदर्भातील प्रस्तावाला अधिकृत मंजुरी दिली आहे.मुंबईतील नगरसेवकांच्या निधीत वाढ करण्यासंदर्भातील ठरावाची सूचना नगरसेविका अश्विनी मते यांनी महापालिका सभागृहात मांडली होती. या सूचनेवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर महापालिका सभागृहाने 1 कोटी रुपयांचा निधी देण्यास एकमुखाने मंजुरी दिली. आता या ठरावावर अंतिम निर्णयासाठी महापालिका आयुक्तांच्या अभिप्रायाची प्रतीक्षा आहे. महापालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, महापालिका आयुक्त अश्विनी भिडे (ASHWINI BHIDE) यांना सकारात्मक अभिप्राय देणे शक्य न झाल्यास, हा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी राज्य सरकारच्या नगरविकास खात्याकडे सादर केला जाईल.मात्र, गेल्या 12 वर्षांत झालेली प्रचंड महागाई, बांधकाम साहित्यांच्या मतीत झालेली वाढ आणि मजुरीच्या खर्चात झालेली वाढ यामुळे सध्या मिळणारा 60 लाख रुपयांचा निधी अत्यंत अपुरा पडत होता. त्यामुळे प्रभागातील कामांना खीळ बसत असल्याने हा निधी 1 कोटी रुपये करण्याची आग्रही मागणी नगरसेविका अश्विनी मते यांनी केली होती. महापालिका सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. आयुक्त अश्विनी भिडे यांनी यावर सकारात्मक स्वाक्षरी केल्यास मुंबईतील सर्व नगरसेवकांना 1 कोटींचा सुधारित निधी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नावाने बनावट अकाऊंट

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नावाने सोशल मीडियावर बनावट अकाउंट तयार करून त्यावर एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केलेले व्हिडिओ, डिजिटल छायाचित्रे तसेच विविध पोस्ट प्रसारित केल्याच्या कथित प्रकरणाचा तपास मंगळवारी जळगाव जिल्ह्यातील नशिराबादपर्यंत पोहोचला. या प्रकरणाच्या तपासासाठी चेन्नई पश्चिम विभाग सायबर गुन्हे पोलिसांचे पथक नशिराबादमध्ये दाखल झाले. पथकाने नशिराबाद येथील होमगार्ड मोहम्मद जुनेद शेख कुतुबुद्दीन याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला जळगाव न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपासासाठी ताबा मिळविण्याची कायदेशीर प्रक्रिया पोलिसांकडून करण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या नावाने बनावट अकाउंटचा संशय चेन्नई सायबर पोलिसांच्या तपासानुसार, मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या नावाने किंवा त्यांच्या ओळखीचा आभास निर्माण करणारे सोशल मीडिया अकाउंट तयार करण्यात आल्याचा संशय आहे. या अकाउंटवरून एआयच्या माध्यमातून तयार केलेले व्हिडिओ, डिजिटल छायाचित्रे आणि विविध पोस्ट प्रसारित करण्यात आल्याचे तपासात समोर आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.ही डिजिटल सामग्री नेमकी कोणी तयार केली, संबंधित अकाउंटचे संचालन कोण करत होते आणि त्याचा प्रसार कोणत्या माध्यमातून करण्यात आला, याचा तपास सायबर पोलिसांकडून सुरू आहे. या प्रकरणी तमिळनाडूमध्ये गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांकडून संबंधित सोशल मीडिया अकाउंट्सचे आयपी लॉग, लिंक्ड अकाउंट्स, ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, सबस्क्रायबर तपशील आणि वापरण्यात आलेल्या डिजिटल उपकरणांची माहिती तपासली जात आहे.

# हक्काच्या जागेवरून वडार समाज आणि व्यापाऱ्यांमध्ये वाद,वडार समाजाचा जागा बळकावल्याचा आरोप!

## चेतन मंडोरे व दीपक खताळ यांनी कागदपत्रे दाखवत दावा फेटाळला

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहरातील सुरत बायपास महामार्गावरील चक्करबर्डी परिसरालगत असलेल्या सिटी सर्वे क्रमांक १००३२ मधील गट क्रमांक ५१०/१-अ पैकी काही जागेवरून वडार समाज आणि व्यापारी चेतन मंडोरे व दीपक खताळ यांच्यात वाद निर्माण झाला आहे. हक्काच्या जागेवर बेकायदेशीर उत्खनन होत असल्याचा आरोप करत वडार समाजाने आक्रमक भूमिका घेत शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत संबंधित जागेवर आंदोलन केले. दुसरीकडे मंडोरे व खताळ यांनी सदर जागेच्या मालकीसंदर्भातील कागदपत्रे दाखवत वडार समाजाचे आरोप फेटाळले आहेत. वडार समाजाच्या म्हणण्यानुसार, शासनाने अनेक वर्षांपूर्वी समाजाला ही जागा दिली असून, या ठिकाणी समाजातील कुटुंबांचा पिढ्यान्पिढ्यांचा रहिवास आहे. १९८८ ची मोजणी शीट, भूमी अभिलेखाचा आलेख तसेच चौकशी नोंदवहीतील उतारे यामध्ये संबंधित नावे असल्याचा दावा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. सदर जमीन नवीन अभिलेखातील सत्ताप्रकारात असल्याने तिची खरेदी-विक्री करता येत नसल्याचा दावा करत, संबंधित जागेवर बेकायदेशीररीत्या ताबा मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप वडार समाजाने केला आहे. या प्रकरणी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचेही समाजाच्या वतीने सांगण्यात आले. खड्डयात उतरून



आंदोलन; उपोषणाचा इशारा आपल्या हक्काच्या जागेसाठी वडार समाज आक्रमक झाला असून, शेकडो नागरिकांनी संबंधित जागेवरील खड्डयात उतरून आंदोलन केले. या प्रकरणी प्रशासनाने तातडीने चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अन्यथा उपोषण करण्यात येईल, असा इशारा वडार समाजाचे दीपक वेताळ यांनी दिला आहे. मंडोरे, खताळ यांच्याकडून कागदपत्रे सादर दरम्यान, या आरोपांबाबत चेतन मंडोरे व दीपक खताळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सदर जागेशी संबंधित खरेदीखत, जुने रेकॉर्ड, मोजणी शीट तसेच ७० वर्षांचे 'ड' पत्रक प्रसारमाध्यमांसमोर दाखवले. सरकारी शुल्क भरून सदर जागा कायदेशीररीत्या खरेदी केल्याचा दावा त्यांनी केला आहे. चेतन मंडोरे यांनी सांगितले की, "वडार समाजाने आपले आरोप सिद्ध करणारी कागदपत्रे सादर करावीत. माझ्याकडील कागदपत्रे चुकीची असल्याचे सिद्ध झाल्यास मी माफी मागण्यास तयार असून समाजाला आवश्यक ती मदतही करेन. मात्र, चुकीची माहिती प्रसारित करून बदनामी केल्यास संबंधितांविरोधात ५० लाख रुपयांचा मानहानीचा दावा तसेच खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर भूमिका घेतली जाईल." दोन्ही गटांकडून पोलिसांत तक्रार सदर जागेवरून दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाल्याचा प्रकार घडल्याची माहिती असून, या घटनेप्रकरणी दोन्ही बाजूंनी शहर पोलिस ठाण्यात एकमेकांविरोधात फिर्याद दाखल केली आहे. या जागेच्या मालकी व हक्काबाबत दोन्ही पक्षांनी प्रशासनाकडे आपापली कागदपत्रे सादर केल्याचा दावा केला आहे. त्यामुळे प्रकरण प्रशासनाच्या विचाराधीन असून, संबंधित कागदपत्रांची तपासणी व कायदेशीर बाबींच्या आधारे प्रशासन काय निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील जागेची मालकी, हक्क व वापर याबाबतची अंतिम वस्तुस्थिती अधिकृत प्रशासकीय तपासणी व कायदेशीर प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

# सोयगाव पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक संपन्न



जन सम्राट टाईम्स


**सोयगाव | प्रतिनिधी:** सोयगाव पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी (DySP) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. आगामी काळातील सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था कायम राखण्याबाबत बैठकीत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी API गोरे, API आरेकर तसेच पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना विविध बाबींवर मार्गदर्शन केले. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती बैठकीस सोयगाव नगरीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास दादा काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (RPI) शहराध्यक्ष रवींद्र भाऊ काळे, तालुकाध्यक्ष कृष्णा पाटील, नगरसेवक संतोष बोडखे, नगरसेवक हर्षल (बंटी) काळे, मराठा मोर्चा समन्वयक विजय दादा काळे तसेच कृषीभूषण अरुण दादा सोहनी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. शांतता व सलोखा राखण्यावर भर बैठकीत आगामी सण-उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, नागरिकांमध्ये परस्पर सलोखा कायम ठेवणे आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रशासन, पोलीस आणि नागरिकांनी परस्पर समन्वयातून शांतता व सुव्यवस्था कायम राखावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# बिबट्याच्या हल्ल्याबाबत चुकीची माहिती पसरवू नका

## वन विभागाचे नागरिकांना आवाहन



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा| प्रतिनिधी :** पाचोरा व परिसरात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांबाबत चुकीची व अप्रमाणित माहिती सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांतून प्रसारित होत असल्याचे वन विभागाच्या निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी इतर हिंस्र प्राणी तसेच भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे झालेली पशुधन हानीदेखील बिबट्याच्या हल्ल्याशी जोडून माहिती प्रसारित केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती व गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असून, अशा प्रकारची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे. पशुधनावर झालेला हल्ला बिबट्यामुळेच झाला आहे, असा निष्कर्ष केवळ घटनास्थळी पाहणी, उपलब्ध पुरावे आणि वन विभागाच्या अधिकृत तपासणीनंतरच काढण्यात येतो. त्यामुळे कोणतीही घटना घडल्यानंतर तिची खात्री न करता ती बिबट्याच्या हल्ल्याची असल्याचे सांगणे अथवा सोशल मीडिया व इतर माध्यमांतून प्रसारित करणे टाळावे, असे वन विभागाने स्पष्ट केले आहे. नागरिकांना पशुधन हानीची घटना निदर्शनास आल्यास त्यांनी तात्काळ संबंधित वन अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना माहिती द्यावी. वन विभागाकडून घटनास्थळी पाहणी करून आवश्यक पुरावे तपासल्यानंतरच घटनेचे नेमके कारण निश्चित करण्यात येईल. तसेच नागरिकांनी अफवा, अप्रमाणित संदेश, फोटो किंवा व्हिडिओ यांच्या आधारे कोणतेही निष्कर्ष काढू नयेत आणि अशा माहितीचा प्रसारही करू नये. बिबट्या किंवा अन्य वन्यप्राण्यांच्या उपस्थितीबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी थेट वन विभागाशी संपर्क साधावा. वन विभागाकडून बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांसह वन्यप्राणी-मानव संघर्षाच्या परिस्थितीवर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वन विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.


परिसरात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांबाबत चुकीची व अप्रमाणित माहिती सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांतून प्रसारित होत असल्याचे वन विभागाच्या निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी इतर हिंस्र प्राणी तसेच भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे झालेली पशुधन हानीदेखील बिबट्याच्या हल्ल्याशी जोडून माहिती प्रसारित केली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती व गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असून, अशा प्रकारची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# नशिराबादचे 'अण्णा नगर' नामांतर करा चौधरी यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन!

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी:** नशिराबाद शहराचे अधिकृत नामांतर परमपूज्य संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या नावावरून 'अण्णा नगर' करण्यात यावे, अशी मागणी शहरातील जागरूक नागरिक रोहित बाळू चौधरी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी नशिराबाद नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या स्मृती व कार्याला कायमस्वरूपी सन्मान मिळावा आणि नशिराबाद शहराला स्वतंत्र सामाजिक व सांस्कृतिक ओळख प्राप्त व्हावी, यासाठी शहराचे नामांतर 'अण्णा नगर' करण्यात यावे.

'अण्णा नगर' नावाला जनमान्यता मिळाल्याचा दावा शहरातील विविध धार्मिक, सामाजिक तसेच सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये नागरिकांकडून 'अण्णा नगर' हे नाव मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या जनभावनेचा विचार करून नगर परिषदेने सर्वसाधारण सभेत ठराव करून नामांतराबाबतचा आवश्यक कायदेशीर प्रस्ताव सक्षम



शासन प्राधिकाऱ्यांकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. कोणत्याही पक्षाविरोधातील मागणी नसल्याचे स्पष्ट ही मागणी कोणत्याही व्यक्ती किंवा राजकीय पक्षाच्या विरोधात नसून, शहराची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासोबत संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या स्मृतीला सन्मान देण्याच्या उद्देशाने करण्यात आली नामांतरासाठी स्वाक्षरी मोहीम राबविणार सध्या हे निवेदन एकट्याने देण्यात आले असले तरी आगामी काळात या मागणीला व्यापक जनसमर्थन मिळविण्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. "अण्णांचे नाव जनतेच्या मनात आहे; आता त्या भावनांना कायदेशीर ओळख मिळावी!" अशी भूमिका रोहित चौधरी यांनी मांडली आहे. निवेदनावर नगर परिषद प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करून त्याबाबत लेखी स्वरूपात माहिती द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. नशिराबाद शहराचे अधिकृत नामांतर परमपूज्य संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या नावावरून 'अण्णा नगर' करण्यात यावे, अशी मागणी शहरातील जागरूक नागरिक रोहित बाळू चौधरी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी ८ सप्टेंबर २०२६ रोजी नशिराबाद नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या स्मृती व कार्याला कायमस्वरूपी सन्मान मिळावा आणि नशिराबाद शहराला स्वतंत्र सामाजिक व सांस्कृतिक ओळख प्राप्त व्हावी, यासाठी शहराचे नामांतर 'अण्णा नगर' करण्यात यावे.

# सावद्यात शांतता समितीची बैठक सण-उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन

## अफवांपासून सावध राहण्याचे पोलिसांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**सावदा । प्रतिनिधी:** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच सर्वधर्मीयांमध्ये सामाजिक सलोखा कायम राहावा, यासाठी सावदा येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ही बैठक शांततेच्या आणि सलोख्याच्या वातावरणात पार पडली. बैठकीस अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदराज पाटील, सावदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश फड, उपनिरीक्षक सानप यांच्यासह शहरातील विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, शांतता समितीचे सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक तसेच मुस्लिम कमिटीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नका बैठकीत मार्गदर्शन करताना अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांनी नागरिकांना आणि गणेश मंडळांच्या



कार्यकर्त्यांना सण-उत्सव शांततेत व कायद्याचे पालन करून साजरे करण्याचे आवाहन केले. "सणांचा आनंद घेताना कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची सर्वांनी दक्षता घ्यावी. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही आक्षेपार्ह किंवा वादग्रस्त पोस्ट तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अशा पोस्ट पुढे फॉरवर्ड करू नयेत. शहरातील शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येईल," असा इशाराही त्यांनी दिला. मिरवणुका, डीजे आणि वाहतूक व्यवस्थेबाबत चर्चा बैठकीदरम्यान गणेशोत्सव तसेच आगामी सणांच्या काळातील मिरवणुका, ध्वनी प्रदूषण, डीजेचा वापर, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी उपस्थित सर्व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच शांतता समितीच्या सदस्यांनी पोलीस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सावदा शहराची ऐतिहासिक शांतता आणि सामाजिक सलोख्याची परंपरा यापुढेही कायम राखण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. बैठकीचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला. संपूर्ण बैठक अत्यंत सलोख्याच्या आणि सकारात्मक वातावरणात पार पडली. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या कोणत्याही आक्षेपार्ह किंवा वादग्रस्त पोस्ट तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अशा पोस्ट पुढे फॉरवर्ड करू नयेत.

# शिवनेरी मित्रमंडळाचा मंडप भूमिपूजन सोहळा दिमाखात संपन्न

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** येथील शिवनेरी मित्रमंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेला मंडप भूमिपूजन सोहळा अत्यंत उत्साहात आणि धार्मिक वातावरणात पार पडला. मंडळाचे हे १९ वे वर्ष असून, या निमित्ताने आयोजित पूजनास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. शास्त्रोक्त मंत्रोच्चारात मंडप उभारणीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या सोहळ्याला



शिवसेना जिल्हाप्रमुख अतुलभाऊ सोनवणे, उपजिल्हाप्रमुख न्हानूभाऊ परदेशी आणि सुप्रसिद्ध डॉ. विनोदजी छाजेड,विजय चिंचोले, यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या हस्ते कुदळ मारून आणि श्रीफळ वाढवून भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना मान्यवरांनी शिवनेरी मित्रमंडळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे भरभरून कौतुक केले. गेली १८वर्षे अविरतपणे लोकसेवेचा आणि उत्सवप्रियतेचा वारसा जपणारे हे मंडळ १९व्या वर्षात पदार्पण करत असल्याबद्दल सर्वांनी मंडळाचे कौतुक करून गणेशोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा युवासेना जिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रसंगी मंडळाचे यावर्षी चे अध्यक्ष शुभम कुटे,सोमेश कानकाटे,हितेश साळुंखे,जयेश फुलपगारे, संकेत कोठावदे,गौरव पाटील,प्रेम कानकाटे,जयेश नाईक,अमोल शिंदे,हितेश साळुंखे,प्रणित पाटील,ओम् कानकाटे, गोपाल चव्हाण,जयेश मुसळे,दक्ष प्रजापत,आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# पिंपरीतील जि.प. शाळेच्या इमारत बांधकामावर अनियमिततेचे आरोप

## निकृष्ट साहित्य वापरल्याचा ग्रामस्थांचा दावा



जन सम्राट टाईम्स

**सोयगाव| प्रतिनिधी:** सोयगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत माळेगाव पिंपरी अंतर्गत मौजे पिंपरी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू असून काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, या बांधकामात अनियमितता होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला असून, कामाची तातडीने तांत्रिक पाहणी करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रत्यक्ष स्थळ पाहणीदरम्यान बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक माहिती फलक लावण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ६ ऑगस्ट २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार शासकीय बांधकामाच्या ठिकाणी संबंधित कामाची माहिती देणारा फलक लावणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अंदाजपत्रकानुसार काम होत नसल्याचा आरोप बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या दर्जाबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असून, मंजूर अंदाजपत्रकानुसार (इस्टिमेटनुसार) काम केले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात उपसरपंचांनी ठेकेदाराकडे कामाचे इस्टिमेट मागितले असून, माहिती फलक लावेपर्यंत काम बंद ठेवण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, त्यानंतरही काम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ठेकेदाराच्या कामकाजाला सरपंच व ग्रामसेवक यांचे समर्थन असल्याची चर्चा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आरोपांबाबत संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया उपलब्ध झालेली नाही. आठ दिवसांत कार्यवाहीची मागणी या प्रकरणी दैनिक जन सम्राट टाईम्सचे प्रतिनिधी शिवराम जाधव यांनी ३ सप्टेंबर २०२६ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे लेखी निवेदन साद केले आहे.

# MPSC परीक्षेतील कथित गैरप्रकारांविरोधात जळगावात विद्यार्थ्यांचा एल्गार

## ९ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन; विविध मागण्यांसाठी सहभागी होण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विविध परीक्षांबाबत विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर ९ सप्टेंबर २०२६ रोजी जळगावात विद्यार्थ्यांच्या वतीने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता जी.एस. ग्राउंड येथून आंदोलनाला सुरुवात होऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्यात येणार आहे.

या आंदोलनात जळगाव जिल्ह्यासह राज्यातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पोस्टरवर "आज नाही लढलो, तर कधीच जिंकणार नाही!" असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. MPSC परीक्षांमध्ये पारदर्शकता राखणे, कथित गैरप्रकारांची चौकशी करणे तसेच परीक्षा प्रक्रियेतील विविध बाबींची सखोल तपासणी करणे, या प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या MPSC चे अध्यक्ष व सचिव यांनी राजीनामा देऊन त्यांच्या जागी स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांची तातडीने नियुक्ती करावी. गट-ब परीक्षेतील कथित




गैरप्रकारांबाबत तातडीने स्पष्टीकरण देऊन त्याची चौकशी करावी. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ आणि कृषीसेवा परीक्षेच्या वर्णनात्मक पेपर तपासणीतील कथित त्रुटींची चौकशी करावी. मुंबई क्राईम ब्रँचकडून MPSC ला देण्यात आलेला प्राथमिक चौकशी अहवाल सार्वजनिक करावा. अटक करण्यात आलेल्या आरोपींशी संबंधित सचिव लांडगे यांच्या कार्यकाळातील सर्व परीक्षांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे. आरोपी लांडगे, मराठे आणि नवथाने यांच्या सेवाकाळाची तसेच पदोन्नतीच्या निकषांची सखोल चौकशी करावी. संशयित संपर्कातून निवड झाल्याचा आरोप असलेल्या उमेदवारांचे CDR तपासण्यात यावेत. प्रविण पाटील व मधुर ठाकरे यांच्यासह इतर कथित एजंट्सच्या सहभागाची सखोल चौकशी करावी. इतर परीक्षांच्या निकालांबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांची दखल घेऊन स्वतंत्र चौकशी करावी. 'D' मधील संशयास्पद निकाल तसेच उन्नती विद्यार्थ्यांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी होणारी गट-क पूर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने घेण्यात यावी. लघुलेखक (Stenographer) पद पुन्हा नियमित करण्यात यावे. विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या या मागण्यांवर शासन आणि संबंधित यंत्रणा काय भूमिका घेतात, याकडे आता विद्यार्थी तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांचे लक्ष लागले आहे. आंदोलनाच्या माध्यमातून परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवण्याची मागणी करण्यात येणार आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# प्रभाग क्रमांक 9 मध्ये 'एमएसआरटीसी स्मार्ट कार्ड' नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद!

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** पाचोरा शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये कै. गं. भा. प्रभावती ताई केशव शेठ सोनार बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने एमएसआरटीसी स्मार्ट कार्ड नोंदणी कॅम्प मोठ्या उत्साहात पार पडला. या अभियानाला प्रभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विशेषतः महिला भगिनींनी स्मार्ट कार्ड नोंदणीसाठी मोठी उपस्थिती दर्शविली. जनसेवक तथा 'तालुका माझा न्यूज'चे संपादक बंडूभाऊ केशव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांना शासनाच्या विविध सवलती व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन तसेच नोंदणीची सुविधा या कॅम्पच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली. शासकीय योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती सहज उपलब्ध व्हावी आणि त्यासाठी अनावश्यक धावपळ करावी लागू नये, या उद्देशाने संस्थेच्या माध्यमातून विविध जनहिताचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. यापुढेही शासनाच्या विविध योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम संस्थेमार्फत सातत्याने करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



पाचोरा शहरातील तसेच प्रभागातील एकही पात्र नागरिक शासनाच्या योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. नागरिकांना योजनांची माहिती, आवश्यक कागदपत्रे तसेच नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून विविध शिबिरे व अभियानांचे आयोजन केले जाणार आहे. 'योजना प्रत्येक घरापर्यंत' पोहोचविण्याचा निर्धार स्मार्ट कार्ड नोंदणी कॅम्पच्या माध्यमातून सुरू झालेला हा जनसेवेचा उपक्रम पुढील काळातही व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. "शासनाच्या योजना जनतेपर्यंत आणि जनतेचा हक्काचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत" पोहोचविण्याचा संस्थेचा प्रयत्न राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. शासनाच्या विविध योजना व सवलतींसंदर्भात अधिक माहितीसाठी नागरिकांनी संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन कै. गं. भा. प्रभावती ताई केशव शेठ सोनार बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने करण्यात आले. पाचोरा शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये कै. गं. भा. प्रभावती ताई केशव शेठ सोनार बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने एमएसआरटीसी स्मार्ट कार्ड नोंदणी कॅम्प मोठ्या उत्साहात पार पडला. या अभियानाला प्रभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विशेषतः महिला भगिनींनी स्मार्ट कार्ड नोंदणीसाठी मोठी उपस्थिती दर्शविली. जनसेवक तथा 'तालुका माझा न्यूज'चे संपादक बंडूभाऊ केशव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांना शासनाच्या विविध सवलती व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन तसेच नोंदणीची सुविधा या कॅम्पच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली. शासकीय योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती सहज उपलब्ध व्हावी आणि त्यासाठी अनावश्यक धावपळ करावी.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भडगावात शांतता समितीची बैठक



जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत उत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याच्या उद्देशाने भडगाव येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. भडगाव पंचायत समितीच्या जिजामाता सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत चाळीसगाव परिक्षेत्राचे अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सव काळात सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करून सामाजिक सलोखा, शांतता आणि सुव्यवस्था कायम राखावी, असे आवाहन त्यांनी केले. सुरक्षा व वाहतूक नियोजनावर चर्चा बैठकीत गणेशोत्सवाच्या काळातील सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, गणेश विसर्जन मिरवणुका तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

गणेश मंडळांनी नियमांचे पालन करून प्रशासनाशी समन्वय साधावा, तसेच उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी नागरिकांनीही सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले. विविध विभागांचे अधिकारी व गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित बैठकीस चाळीसगाव परिक्षेत्राचे अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, भडगाव तहसीलदार शीतल सोलाट, भडगाव पोलीस निरीक्षक महेश टाक, महावितरण विभागाचे अधिकारी, भडगाव नगरपरिषदेचे अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी, आरटीओ विभागाचे अधिकारी, पत्रकार, पोलीस पाटील तसेच विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्धार प्रशासन आणि नागरिकांनी परस्पर समन्वयातून गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असून, नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत उत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याच्या उद्देशाने भडगाव येथे शांतता समितीची बैठक घेण्यात आली. भडगाव पंचायत समितीच्या जिजामाता सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत चाळीसगाव परिक्षेत्राचे अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सव काळात सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करून सामाजिक सलोखा, शांतता आणि सुव्यवस्था कायम राखावी, असे आवाहन त्यांनी केले.

## मुख्यमंत्र्यांच्या नावाने बनावट इंस्टाग्राम खाते? चेन्नई वेस्ट झोन पोलिसांची नशिराबादमध्ये चौकशी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी:** मुख्यमंत्री विजय थलपती यांच्या नावाने कथित बनावट Instagram खाते तयार करून त्यावर आक्षेपार्ह स्वरूपाच्या पोस्ट प्रसारित केल्याप्रकरणी चेन्नई वेस्ट झोन पोलिसांनी नशिराबाद येथील ताज नगर परिसरात राहणाऱ्या एका होमगार्ड जवानाची चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात येत असून, तपासासाठी चेन्नई पोलिसांचे पथक नशिराबाद येथे दाखल झाल्याची माहिती आहे. फॉलोअर्स वाढविण्यासाठी बनावट खाते तयार केल्याचा संशय नशिराबाद येथील ताज नगर परिसरातील होमगार्ड जवान मोहम्मद जुनेद शेख कुदबुद्दीन याची या प्रकरणात चौकशी करण्यात येत आहे. स्वतःच्या सोशल मीडिया खात्यावरील फॉलोअर्स वाढविण्याच्या उद्देशाने संबंधित व्यक्तीने मुख्यमंत्र्यांच्या नावाने कथित बनावट Instagram खाते तयार केले असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या खात्यावर अश्लील तसेच आक्षेपार्ह स्वरूपाच्या पोस्ट





प्रसारित करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी संबंधित राज्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याचे समजते. आर्थिक व्यवहारांचीही तपासणी प्रकरणाच्या तपासादरम्यान संबंधित व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांचीही पोलिसांकडून पडताळणी केली जात असल्याची माहिती आहे.संबंधित व्यक्तीला जळगाव येथील न्यायालयात हजर करण्यात आल्याची माहिती आहे.चेन्नई वेस्ट झोन पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू असून, चौकशी आणि तांत्रिक तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध माहितीच्या आधारे संबंधित व्यक्तीवरील आरोपांची अंतिम पुष्टी झालेली नसून अधिकृत तपास अहवालाची प्रतीक्षा आहे.मुख्यमंत्री विजय थलपती यांच्या नावाने कथित बनावट Instagram खाते तयार करून त्यावर आक्षेपार्ह स्वरूपाच्या पोस्ट प्रसारित केल्याप्रकरणी चेन्नई वेस्ट झोन पोलिसांनी नशिराबाद येथील ताज नगर परिसरात राहणाऱ्या एका होमगार्ड जवानाची चौकशी केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात येत असून, तपासासाठी चेन्नई पोलिसांचे पथक नशिराबाद येथे दाखल झाल्याची माहिती आहे. फॉलोअर्स वाढविण्यासाठी बनावट खाते तयार केल्याचा संशय नशिराबाद येथील ताज नगर परिसरातील होमगार्ड जवान मोहम्मद जुनेद शेख कुदबुद्दीन याची या प्रकरणात चौकशी करण्यात येत आहे. स्वतःच्या सोशल मीडिया खात्यावरील फॉलोअर्स वाढविण्याच्या उद्देशाने संबंधित व्यक्तीने मुख्यमंत्र्यांच्या नावाने कथित बनावट Instagram खाते तयार केले असल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या खात्यावर अश्लील तसेच आक्षेपार्ह स्वरूपाच्या पोस्ट प्रसारित करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी संबंधित राज्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याचे समजते.

## सहावीतल्या इंद्रजीतने ४५ अक्षरी इंग्रजी शब्द केला काही क्षणांत पाठ!

जन सम्राट टाईम्स

**चोपडा । (प्रतिनिधी):** सहावी इयत्तेत शिकणाऱ्या इंद्रजीत क्षीरसागर याने तब्बल ४५ अक्षरांचा इंग्रजी शब्द काही क्षणांत पाठ करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या असामान्य स्मरणशक्तीचे पालक, शिक्षक आणि परिसरातून कौतुक होत आहे. इंद्रजीतने इंग्रजी भाषेतीलहा ४५ अक्षरी शब्द काही क्षणांत लक्षात ठेवून तो अचूकपणे उच्चारून दाखविला. या कामगिरीमुळे त्याची स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाची विशेष चर्चा होत आहे. पदमाकर पाटील सरांचे मोलाचे मार्गदर्शन इंद्रजीतला ही उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी पदमाकर पाटील सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सरांच्या मार्गदर्शनामुळे त्याने हे आव्हान आत्मविश्वासाने स्वीकारत यशस्वीपणे पूर्ण केले. काय आहे या शब्दाचा अर्थ? Pneumonoultramicroscopicsilicovolcanoconiosis हा वैद्यकीय संदर्भातील एक प्रदीर्घ इंग्रजी शब्द असून,



त्याचा संबंध अतिसूक्ष्म सिलिका धूलिकणांच्या दीर्घकाळ संपर्कामुळे होणाऱ्या फुफ्फुसाच्या आजाराशी आहे.
शब्दाच्या लांबीमुळे तो इंग्रजीतील सर्वात प्रसिद्ध प्रदीर्घ शब्दांपैकी एक म्हणून ओळखला जातो. या शब्दाचा उच्चार साधारणपणे 'न्यमोनोअल्ट्रामाइक्रोस्कोपिक सिलीकोव्होल्कॅनोकोनिओसिस' असा केला जातो. इंद्रजीतवर अभिनंदनाचा वर्षाव इंद्रजीतच्या या कामगिरीबद्दल पालक, शिक्षक आणि ज्येष्ठांकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्याने आपल्या स्मरणशक्तीच्या जोरावर केलेली ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. भविष्यात इंद्रजीतने शिक्षणासह विविध क्षेत्रांत अशीच उत्तुंग कामगिरी करावी, अशा शुभेच्छा त्याला देण्यात येत आहेत. सहावी इयत्तेत शिकणाऱ्या इंद्रजीत क्षीरसागर याने तब्बल ४५ अक्षरांचा इंग्रजी शब्द काही क्षणांत पाठ करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या असामान्य स्मरणशक्तीचे पालक, शिक्षक आणि परिसरातून कौतुक होत आहे. इंद्रजीतने इंग्रजी भाषेतील या कामगिरीमुळे त्याची स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाची विशेष चर्चा होत आहे.

पदमाकर पाटील सरांचे मोलाचे मार्गदर्शन इंद्रजीतला ही उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी पदमाकर पाटील सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सरांच्या मार्गदर्शनामुळे त्याने हे आव्हान आत्मविश्वासाने स्वीकारत यशस्वीपणे पूर्ण केले. वैद्यकीय संदर्भातील एक प्रदीर्घ इंग्रजी शब्द असून, त्याचा संबंध अतिसूक्ष्म सिलिका धूलिकणांच्या दीर्घकाळ संपर्कामुळे होणाऱ्या फुफ्फुसाच्या आजाराशी आहे. शब्दाच्या लांबीमुळे तो इंग्रजीतील सर्वात प्रसिद्ध प्रदीर्घ शब्दांपैकी एक म्हणून ओळखला जातो.

## नशिराबाद येथे सेना महाराजांची पुण्यतिथी उत्साहात अभिषेक, सत्यनारायण पूजा व पालखी सोहळ्यासह कीर्तन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** नशिराबाद येथे संत शिरोमणी श्री सेना महाराजांची पुण्यतिथी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. वरची आळी येथील श्री संत सेना महाराज मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नशिराबाद व परिसरातील नाभिक समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सेना महाराजांच्या मूर्तीचा विधिवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सत्यनारायणाची पूजा श्री चेतन टेमकर यांनी सपत्नीक केली. तसेच पालखी पूजन श्री बाळू ओंकार निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

वारकरी विद्यार्थ्यांचा पालखी सोहळ्यात सहभाग पालखी सोहळ्यात जळगाव येथील राधाकृष्ण वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात पालखी सोहळा पार पडला. यानंतर ह.भ.प. गोपालजी महाराज दापोरीकर यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून संत सेना महाराजांच्या कार्याचा व विचारांचा जागर करण्यात



आला. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थी व कर्तृत्ववान समाजबांधवांचा सत्कार पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने समाजातील गुणवंत विद्यार्थी, शासकीय सेवेत रुजू झालेले तसेच पदोन्नती मिळविणाऱ्या समाजबांधवांचा सत्कार करण्यात आला. शासकीय सेवेत पदोन्नती मिळाल्याबद्दल अजय पंडितराव शिवरामे, मध्य रेल्वेत लोको पायलट म्हणून निवड झाल्याबद्दल रितेश नरेंद्र आमोदकर, तसेच सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. प्रमोद आमोदकर यांचा सत्कार करण्यात आला. दहावी उत्तीर्ण झालेल्या यश गणेश आमोदकर, मानसी नरेंद्र निकम आणि साहिल रवींद्र गालफाडे, बारावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंती पुरुषोत्तम टेमकर आणि रागिणी दीपक गालफाडे, तसेच MBA उत्तीर्ण झालेल्या कामिनी अनिल शिवरामे आणि रुपेश नरेंद्र आमोदकर यांचाही गौरव करण्यात आला. नवनिर्वाचित अध्यक्षांचा सत्कार यावेळी मावळते अध्यक्ष राजेश बळीराम आमोदकर तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष दीपक प्रल्हाद गालफाडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन आमोदकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नशिराबाद व परिसरातील समाजबांधवांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## निता अकॅडमीवर कारवाईची मागणी; अनधिकृत बांधकाम असल्यास पाडण्याची मागणी

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाचे नगरपंचायतीला निवेदन

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । प्रतिनिधी:** बोदवड शहरातील निता अकॅडमीच्या संचालकाविरुद्ध अल्पवयीन विद्यार्थिनीवरील अत्याचाराच्या आरोपाप्रकरणी पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्याच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाज, बोदवड तालुक्याच्या वतीने प्रशासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात ८ सप्टेंबर रोजी तहसीलदार तसेच नगरपंचायत प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात संबंधित आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच त्याला सहकार्य करणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून दोष



आढळल्यास त्यांच्यावरही कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच आरोपीला आश्रय देणाऱ्या व्यक्तींचीही चौकशी करून भविष्यात अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये आरोपींना आश्रय मिळणार नाही, यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. अकॅडमीच्या इमारतीची कायदेशीर तपासणी करण्याची मागणी दरम्यान, निता अकॅडमीची इमारत व वर्ग विनापरवानगी सुरू असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.
संबंधित इमारतीची कायदेशीर तपासणी करून बांधकाम अथवा वापराबाबत अनियमितता आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अनधिकृत बांधकाम आढळल्यास नियमाप्रमाणे इमारत पाडण्याची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही सकल हिंदू समाजाच्या निवेदनात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची आगाऊ फी परत करण्याची मागणी निता अकॅडमी बंद झाल्यास विद्यार्थ्यांकडून आगाऊ स्वरूपात घेण्यात आलेली वार्षिक फी परत मिळावी, यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.
विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि त्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण व्हावे, यासाठी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निष्पक्ष चौकशीची मागणी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित व्यक्तींवरील आरोपांची अंतिम सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होणार असून, पोलिस तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निता अकॅडमीच्या संचालकाविरुद्ध अल्पवयीन विद्यार्थिनीवरील अत्याचाराच्या आरोपाप्रकरणी पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्याच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाज, बोदवड तालुक्याच्या वतीने प्रशासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

## पाळधीत श्री संत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजन!

जन सम्राट टाईम्स

**पाळधी, ता. धरणगाव | प्रतिनिधी:** पाळधी येथे श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव गुलाबराव पाटील यांच्या हस्ते संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सत्यनारायण पूजन नवदांपत्य मुकेश फुलपगार व सौ. धनश्री फुलपगार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला खोंडे बंधू ज्वेलर्सचे संतोष खोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नाभिक समाज मंडळाचे गोपाल सोनवणे, स्वप्नील फुलपगार, मुकेश फुलपगार, सोनू फुलपगार, संदीप फुलपगार, गणेश फुलपगार, नितीन फुलपगार, आत्माराम फुलपगार,



गोविंद फुलपगार, सुभाष श्रीखंडे, गोपाल फुलपगार, प्रकाश श्रीखंडे, अशोक श्रीखंडे, गुलाब सोनवणे, किरण पगारे, संदीप श्रीखंडे, लक्ष्मण कुवर, कैलास फुलपगार, विनोद फुलपगार, तुषार फुलपगार, पंकज फुलपगार, मंगेश फुलपगार, प्रद्युम फुलपगार, मिलिंद फुलपगार, जितेंद्र फुलपगार, आदित्य फुलपगार, छकुला फुलपगार यांच्यासह समाजबांधव व भगिनींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत .

# जटवाडा रोडवर देशी पिस्तूल व जिवंत काडतुसे बाळगणारे दोघे अटकेत

## ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त, न्यायालयाकडून तीन दिवसांची पोलीस कोठडी

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी:** जटवाडा रोड परिसरात देशी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या दोन तरुणांना बेगमपुरा पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी केलेल्या कारवाईत पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि दोन मोबाईल असा एकूण ६३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी (PCR) सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरबाज अलीम शेख (वय १९, रा. जटवाडा गाव) आणि खान अय्यान नईम खान (वय २१, रा. जफर पार्क, जटवाडा रोड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. गॅलेक्सी टर्फ परिसरात पोलिसांची कारवाई ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.०५ वाजता जटवाडा रोडवरील गॅलेक्सी टर्फ परिसरात पोलिसांनी कारवाई केली. यावेळी अरबाज अलीम शेख याच्याकडून सुमारे ४० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल आणि ३ हजार रुपये किमतीची तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तसेच त्याच्याकडील सॅमसंग कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ५३ हजार



रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. चौकशीत दुसऱ्या आरोपीचे नाव समोर प्राथमिक चौकशीत अरबाज याने सदर पिस्तूल व काडतुसे खान अय्यान नईम खान याने आपल्याकडे दिल्याचे पोलिसांना सांगितल्याची माहिती आहे. त्यानंतर पोलिसांनी अय्यान खान यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे १० हजार रुपये किमतीचा Infinix GT मोबाईल जप्त करण्यात आला. दरम्यान, दोन्ही आरोपींच्या मोबाईलची तपासणी केली असता अरबाज शेख याच्या मोबाईलच्या फोटो गॅलरीमध्ये पिस्तूलचे फोटो व व्हिडिओ आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचाही आरोप या प्रकरणी बेगमपुरा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २८१/२०२६ अन्वये कलम ३, २५ भा. ह. का. सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोलीस आयुक्तांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचाही आरोप आरोपींवर करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मपोउपनि. मनीषा केदार करीत आहेत. पोलिसांच्या पथकाची कामगिरी पोलीस निरीक्षक प्रविणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मारुती मादेवाड, हेड कॉन्स्टेबल उमेश ठाकूर, पोलीस कॉन्स्टेबल शैलेश नलवाडे, पोलीस कॉन्स्टेबल जगताप तसेच पीएसआय मनीषा केदार यांनी ही कारवाई केली.

# मूर्तिकार राजू घोडके जोपासतायत १९४५ पासूनची मूर्तीकलेची परंपरा



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। प्रतिनिधी:** आधुनिक युगात पारंपरिक कला लोप पावत असताना पाचोरा येथील घोडके परिवाराने सन १९४५ पासून मूर्तीकलेची परंपरा जपली आहे. दिवंगत शंकर गणपत घोडके यांनी सन १९४५ मध्ये हिवरा नदीच्या गाळापासून मूर्ती बनविण्यास सुरुवात केली.

त्यांच्या कलेचा वारसा आजही पुढील पिढीतील मूर्तिकार राजू घोडके व त्यांचा परिवार समर्थपणे पुढे नेत आहे. घोडके परिवारातील सुमारे सहा सदस्य एकत्रितपणे गणपती, देवी तसेच विविध महापुरुषांच्या आकर्षक व सुबक मूर्ती साकारतात. त्यांच्या कार्यशाळेत सहा इंचांपासून तब्बल २१ फुटांपर्यंतच्या मूर्ती तयार केल्या जातात.'
गणेशोत्सव मंडळांसाठी आकर्षक देखावे तसेच विविध ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या हुबेहूब मूर्ती तयार करण्याचे कौशल्यही या परिवाराने जपले आहे. घोडके यांच्या हातून साकारलेल्या आकर्षक मूर्तींना पाचोरा परिसरासह मनमाड, नाशिक, सटाणा तसेच आठ ते दहा जिल्ह्यांतून मागणी असते. पारंपरिक पद्धतीसोबत आधुनिक कलाकुसरीचा वापर करून मूर्तींना आकर्षक आणि जिवंत रूप देण्याचे काम राजू घोडके व त्यांचे कुटुंबीय करीत आहेत. बदलत्या काळातही आपल्या पूर्वजांनी सुरू केलेली मूर्तीकलेची परंपरा जिवंत ठेवत घोडके परिवाराने पाचोऱ्याच्या कलाक्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. तब्बल ८० वर्षांहून अधिक काळाची ही परंपरा आजच्या पिढीकडूनही तितक्याच श्रद्धेने आणि मेहनतीने पुढे नेली जात आहे. त्यांच्या या कलासाधनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# धरणगावात विद्यार्थ्यांना एड्सविषयी मार्गदर्शन

## लैंगिक आरोग्याबाबत जनजागृती



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0 अंतर्गत गुड शेफर्ड अकॅडमी इंग्लिश स्कूल, धरणगाव येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य, आरोग्य व एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ICTC ग्रामीण रुग्णालय, धरणगाव आणि साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ रोजी हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी किशोरावस्था, प्रजननक्षम व लैंगिक आरोग्य, मानसिक आरोग्याच्या समस्या, मादक पदार्थांचा दुरुपयोग तसेच एचआयव्ही-एड्स आणि लैंगिक आजारांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. किशोरावस्थेतील बदलांबाबत शास्त्रीय माहिती कार्यक्रमात विद्यार्थ्यांना किशोरावस्थेत होणारे शारीरिक व मानसिक बदल, प्रजननक्षम व लैंगिक आरोग्य याबाबत शास्त्रीय पद्धतीने माहिती देण्यात आली. एचआयव्ही-एड्सचा संसर्ग होण्याचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय तसेच शासनाकडून उपलब्ध असलेल्या मोफत उपचार व आरोग्यसेवा याविषयीही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच एचआयव्ही आणि एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायद्याची माहिती देत एचआयव्हीबाधित व्यक्तींना मिळणारे कायदेशीर संरक्षण, त्यांचे हक्क आणि गोपनीयतेचा अधिकार याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले. मानसिक आरोग्य आणि व्यसनमुक्तीवरही मार्गदर्शन किशोरवयात निर्माण होणाऱ्या विविध मानसिक आरोग्यविषयक समस्या, त्यावरील उपाय, योग्य समुपदेशनाचे महत्त्व तसेच मादक पदार्थांच्या दुरुपयोगाचे होणारे दुष्परिणाम याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. योग्य माहिती, सकारात्मक विचार आणि जबाबदार वर्तनातून किशोरवयीन विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका श्रीमती चैताली राऊतोडे, उपमुख्याध्यापक श्री. जाधव सर, श्रीमती नाजुका भदाणे, श्रीमती भारती तिलक, ICTC विभागाचे समुपदेशक ज्ञानेश्वर शिंपी, RKS K समुपदेशक गणेश कुंभार, साने गुरुजी फाउंडेशन, अमळनेरच्या लिंक वर्कर अश्विनी शिंपी यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंटेंसिफाइड कॅम्पेन 3.0 अंतर्गत गुड शेफर्ड अकॅडमी इंग्लिश स्कूल, धरणगाव येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य, आरोग्य व एचआयव्ही-एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# नशिराबाद पोलिसांचा पहाटेचा 'खाक्या': गुन्हेगारांवर अचानक धाड

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासह कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नशिराबाद पोलिसांनी मंगळवारी पहाटेच्या सुमारास जोरदार कोम्बिंग ऑपरेशन राबविले. पहाटे ३ ते ५.३० वाजेपर्यंत विविध ठिकाणी अचानक करण्यात आलेल्या या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बरबोले यांच्या मार्गदर्शनाखाली नशिराबाद पोलिसांच्या पथकाने ही धडक मोहीम राबविली.
संशयितांची झाडाझडती वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार पोलिसांनी विविध पथके तयार करून पहाटेच्या अंधारात संशयित ठिकाणे तसेच गुन्हेगारांच्या अड्ड्यांवर अचानक तपासणी केली. या कारवाईदरम्यान न्यायालयीन वॉरंट असलेल्या एका आरोपीला अटक करण्यात आली. याशिवाय पोलिसांनी ३ हद्दपार इसमांची तपासणी केली. तसेच ५



हिस्ट्रीशीटर आणि पोलिसांच्या रेकॉर्डवरील ३ आरोपींची कसून झडती व चौकशी करण्यात आली. २७ संशयित वाहने पोलिसांच्या ताब्यात कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान पहाटेच्या वेळी संशयास्पदरीत्या फिरताना आढळलेल्या तसेच आवश्यक कागदपत्रे नसलेल्या २७ वाहनांना पोलिसांनी ताब्यात घेतले. वाहनांची कागदपत्रे आणि संबंधित बाबींची पडताळणी करण्यात येत आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कारवाई सुरूच राहणार गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर वेळीच नियंत्रण मिळविणे आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे, हा या मोहिमेमागील प्रमुख उद्देश असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. अशा प्रकारच्या अचानक व धडक तपासणी मोहिमा यापुढेही नियमितपणे सुरू राहतील, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. नशिराबाद पोलिसांच्या पहाटेच्या या धडक कारवाईचे परिसरातून स्वागत होत असून, गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांची वाढती सक्रियता चर्चेचा विषय ठरत आहे.
परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासह कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नशिराबाद पोलिसांनी मंगळवारी पहाटेच्या सुमारास जोरदार कोम्बिंग ऑपरेशन राबविले. पहाटे ३ ते ५.३० वाजेपर्यंत विविध ठिकाणी अचानक करण्यात आलेल्या या कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बरबोले यांच्या मार्गदर्शनाखाली नशिराबाद पोलिसांच्या पथकाने ही धडक मोहीम राबविली.

# रावेर तालुक्यात सरपंच आरक्षण सोडतीला वेग! OBC प्रवर्गासाठी १७ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित

## ५८ सरपंचपदांसाठी आज महिला आरक्षणाची सोडत

जन सम्राट टाईम्स

**वाघोदा । प्रतिनिधी:** रावेर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षण प्रक्रियेला वेग आला आहे. नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) यासाठी तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींची सरपंचपदाची आरक्षण सोडत सोमवारी तहसील कार्यालयात काढण्यात आली. या वेळी ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, इच्छुक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तहसील कार्यालयाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता ही प्रक्रिया पार पडली.
प्रभारी तहसीलदार संजय तायडे, निवडणूक नायब तहसीलदार आर. डी. पाटील आणि महसूल सहायक भूषण तायडे यांच्या उपस्थितीत सोडत पद्धतीने OBC प्रवर्गासाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली. या १७ ग्रामपंचायतींमध्ये OBC आरक्षण OBC प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेल्या १७ ग्रामपंचायतींमध्ये उटखेडा, सुनोदा, वाघोदे बुद्रुक,



कर्जाद, अजनाड, थोरगव्हाण, विवरे बुद्रुक, सिंगत, रणगाव, अहिरवाडी, खिर्डी खुर्द, खिर्डी बुद्रुक, धुरखेडा, वाघाडी, दसनूर, रमजीपूर आणि अजंदे या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. ५८ सरपंचपदांसाठी महिला आरक्षणाची सोडत दरम्यान, OBC प्रवर्गातील १७ सरपंचपदांसह सर्वसाधारण प्रवर्गातील सरपंचपदांसाठी महिला आरक्षणाची सोडत मंगळवार, ८ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता काढण्यात येणार आहे. महसूल उपविभागीय अधिकारी बबनराव काकडे यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती प्रभारी तहसीलदार संजय तायडे यांनी दिली. सर्वसाधारण प्रवर्गातील सरपंचपदांसाठी रेंभोटा, पुरी, गाते, कोचुर खुर्द, भोकरी, कोळोदे, केऱ्हाळे खुर्द, नांदूरखेडा, सावखेडा खुर्द, वडगाव, भाटखेडा, केऱ्हाळे बुद्रुक, खिरोदा प्रगणे यावल, रसलपूर, उधळी बुद्रुक, रोझोदे, विटवे, तांदलवाडी, तामसवाडी, ऐनपूर, उधळी खुर्द, शिंगाडी, मोरगाव खुर्द, खिरवड, आठवडे, पातोंडी, मंगलवाडी, सुलवाडी, निंभोरासिम, कांडवेल, शिंदखेडा, मस्कावद खुर्द, मोरगाव बुद्रुक, निंबोल, बक्षीपूर, रायपूर, तासखेडा, आंदलवाडी, गौरखेडा बलवाडी आणि निंभोरा बुद्रुक या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. आरक्षणामुळे राजकीय हालचालींना वेग सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीमुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रावेर तालुक्यातील राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची शक्यता आहे. कोणत्या ग्रामपंचायतीचे सरपंचपद महिलांसाठी राखीव होते, याकडे इच्छुक उमेदवारांसह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# मनमाडमध्ये संविधान आर्मीचा राज्यव्यापी मेळावा!

जन सम्राट टाईम्स

**मनमाड। प्रतिनिधी:** ऑल इंडिया संविधान आर्मीच्या वतीने मनमाड येथे राज्यव्यापी मेळावा, राज्यव्यापी बैठक आणि प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी ऑल इंडिया संविधान आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक जगन भाई सोनवणे यांचे मनमाड येथे आगमन होणार आहे. येत्या १३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता हा कार्यक्रम होणार असून, या पार्श्वभूमीवर सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच अधिकारी वर्गाला निमंत्रणे देण्याचे काम सुरू आहे. नगराध्यक्षांसह विविध मान्यवरांना निमंत्रण ऑल इंडिया संविधान आर्मीचे जिल्हा महामंत्री वाल्मिकी नेते मटरूलाल भाई चुनियान यांनी मनमाडचे नगराध्यक्ष तथा शिवसेना (शिंदे गट) नेते योगेश भाऊ उर्फ बबलू भाई पाटील, मनमाड नगरपालिका मुख्याधिकारी श्री. चौधरी, तसेच मनमाडमधील नेते राजाभाऊ अहिरे यांच्यासह विविध मान्यवरांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. याशिवाय संविधान आर्मी महिला आघाडीच्या नाशिक लोकसभा जिल्हाध्यक्षा वंदनाताई काळे, दिंडोरी-नाशिक लोकसभा जिल्हाध्यक्षा सुनीताताई महिरे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष कांचनराव जाधव, अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार मणियार साहेब, नाशिक जिल्हाध्यक्ष शशिकांत भाई शार्दुल, परदेश सल्लागार प्रा. किशोर जाधव, महिला आघाडीच्या महामंत्री मायाताई काळे, OBC सेलचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष सानप साहेब, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष अशोक उगले आणि युवा नेते दीपक भाई शिरसाट यांच्यासह विविध पदाधिकारी व मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात आले आहे.

# वीजचोरी करणाऱ्यांची नावे-पत्ते होणार सार्वजनिक!

## वीजचोरीला आळा घालण्यासाठी कारवाईचे संकेत




जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** वीजचोरीला आळा घालण्यासाठी महावितरणने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. वीजचोरी करताना पकडण्यात आलेल्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईसोबतच त्यांची नावे आणि पत्ते सार्वजनिक करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे वीजचोरी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईबरोबरच सामाजिक दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रत्येक वीज जोडणीवर बारकाईने लक्ष वीजचोरी रोखण्यासाठी प्रत्येक वीज जोडणीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश महावितरणकडून देण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान वीजचोरी करताना आढळून आलेल्या संबंधित व्यक्तींविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधितांचे नाव व पत्ता सार्वजनिक करण्याची प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे सांगण्यात आले. उच्चस्तरीय बैठकीत निर्णय महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी उच्चस्तरीय बैठकीत यासंदर्भात घोषणा केल्याचे सांगण्यात येत आहे. वीजचोरी हा केवळ आर्थिक गैरप्रकार नसून त्याचा परिणाम नियमितपणे वीजबिल भरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांवरही होतो. त्यामुळे वीजचोरीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी महावितरणने कठोर भूमिका घेतली आहे. 'वीजचोरीला आता माफी नाही' प्रामाणिकपणे वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी वीजचोरीविरोधात अधिक कडक भूमिका घेण्यात येत आहे. "प्रामाणिक ग्राहकांच्या हक्कासाठी वीजचोरीला आता माफी नाही," असा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आला आहे. महावितरणच्या या कठोर मोहिमेमुळे वीजचोरीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होईल आणि नियमित वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वीजचोरीला आळा घालण्यासाठी महावितरणने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. वीजचोरी करताना पकडण्यात आलेल्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईसोबतच त्यांची नावे आणि पत्ते सार्वजनिक करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# वरणगाव फॅक्टरीत राजपूत समाजाचा गुणगौरव सोहळा उत्साहात

## गुणवंत विद्यार्थ्यांसह सामाजिक कार्यकर्ते व निवृत्त समाजबांधवांचा सत्कार

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** ऑर्डनन्स फॅक्टरी, वरणगाव येथील कम्युनिटी हॉलमध्ये राजपूत समाज उन्नती मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, सामाजिक सेवा करणाऱ्या व्यक्तींचा तसेच निवृत्त समाजबांधवांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंह राजपूत होते. यावेळी समाधान महाजन, जिल्हाप्रमुख शिवसेना, नरेंद्रसिंग पाटील, नगरसेवक मनपा जळगाव, तृप्ताताई महाजन, नगरसेविका वरणगाव, प्रा. सौ.



संगीता पाटील, चाळीसगाव, प्रा. कल्पना पाटील, प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. काजल पाटील, पाचोरा, विलाससिंग पाटील, तालुकाप्रमुख राष्ट्रवादी काँग्रेस, भुसावळ यांच्यासह श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे प्रदेश संघटक विलाससिंह पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष दामोदर राजपूत, भगवानसिंह खंडाळकर, जिल्हाध्यक्ष विठ्ठलसिंग मोरे, संदीपसिंग राणा, सारिकाताई पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला अभिवादन कार्यक्रमाच्या प्रारंभी वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शिक्षणासोबत संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची गरज प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. काजल पाटील यांनी मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रवीणसिंह राजपूत यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा त्यांच्या मेहनतीला समाजाकडून मिळालेली प्रेरणा असल्याचे सांगितले.
समाजाच्या प्रगतीसाठी युवकांनी पुढे येऊन संघटित होण्याचे आवाहनही त्यांनी केले. पदाधिकाऱ्यांसह समाजबांधवांचे परिश्रम कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंकज जाधव यांनी केले. सूत्रसंचालन सत्यपालसिंग राजपूत यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुनील पाटील सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष सी. एल. पाटील, सचिव प्रवीण पाटील, स्वप्नील राजपूत, सौ. वैशाली पाटील, बाबुलाल पाटील, चंचलसिंग राजपूत, स्वप्नील सोळंके, पवन पाटील यांच्यासह समाजबांधव व महिलांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. ऑर्डनन्स फॅक्टरी, वरणगाव येथील कम्युनिटी हॉलमध्ये राजपूत समाज उन्नती मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, सामाजिक सेवा करणाऱ्या व्यक्तींचा तसेच निवृत्त समाजबांधवांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.